# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
(०२०) २५६२ ११९०
२५६२ ११९१
२५६२ ११९२
२५६२ ११९३

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
संकेतस्थळ : www.unipune.ac.in
ई–मेल:affiliation@pun.unipune.ac.in


संदर्भ क्र.: सीए/620 दिनांक : 29.03.24

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

**विषय :– बी.बी.ए.,बी.सी.ए.,बी.एम.एस.,बी.डिझाईन, बॅचलर ऑफ फॅशन डिझाईन व AICTE (Hand Book) मध्ये नमूद अभ्यासक्रम/विषय,अतिरिक्त तुकडी, विद्याशाखा यांच्या प्रस्तावांच्या अनुषंगाने.**

संदर्भ :– मा. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार कक्ष क्र.४१८, मुंबई – ४०० ०३२. यांचे संदर्भ क्रमांक:HTED-२९०६६/(१९)/१/२०२४/७३११४७–MHT –(HE-4) दिनांक २७ मार्च, २०२४ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रास अनुसरून प्राप्त आदेशानुसार आपणांस कळविण्यांत येते की, उक्त पत्रातील आशय स्वयंस्पष्ट असून त्यातील मुद्दा क्र. ४ मध्ये नमूद केल्यानुसार प्रस्तुत विभागाने नवीन संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिस्थांना अवगत केलेले आहे.

ज्या महाविद्यालये/परिसंस्थांनी विस्तारीकरणांतर्गत नवीन अभ्यासक्रम/विषय, अतिरिक्त तुकडी, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी यांचे प्रस्ताव विद्यापीठात दाखल केलेले आहेत. त्यामध्ये बी.बी.ए.,बी.सी.ए.,बी.एम.एस.,बी.डिझाईन, बॅचलर ऑफ फॅशन डिझाईन व AICTE (Hand Book) यांचा समावेश आहे.

तरी बी.बी.ए.,बी.सी.ए.,बी.एम.एस.,बी.डिझाईन, बॅचलर ऑफ फॅशन डिझाईन व AICTE (Hand Book) मध्ये नमूद अभ्यासक्रम/विषय, अतिरिक्त तुकडी, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी यांचे प्रस्ताव शासनास सादर करण्यात येऊ नये, असे शासनाने दि.२७ मार्च, २०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे. त्यानुसार सदर अभ्यासक्रमांचे प्रस्ताव शासनाकडे शिफारशीत केले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

(गिरीश बेत)
उपकुलसचिव संलग्नता कक्ष
शैक्षणिक विभाग

सोबत – उपरोक्त संदर्भीय पत्र.

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार कक्ष क्र. ४१८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२
Email ID: mashi८-hted@mah.gov.in

क्रमांक:HTED-२९०६६(१९)/१/२०२४/७३११४७-MHT-(HE-४) दिनांक: २७ मार्च, २०२३.

प्रति,
कुलसचिव,
सर्व सार्वजनिक विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

**विषय: बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एम.एस. व बी.डिझाईन, बॅचलर ऑफ फॅशन डिझाईन व AICTE (HAND BOOK) मध्ये नमूद अभ्यासक्रम/विषय, अतिरिक्त तुकडी, विद्याशाखा यांच्या प्रस्तावांच्या अनुषंगाने.**

संदर्भ:- अधिष्ठाता (अति.भार), एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई यांचे दिनांक ०४.०३.२०२४ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ मधील तरतुदीस अनुसरून विस्तारीकरणांतर्गत नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी यांचे प्रस्ताव संबंधित संस्थांनी विद्यापीठात अधिनियमातील तरतुदीनुसार विद्यापीठात दाखल केले आहे.

२. तथापि, दरम्यानच्या कालावधीत, विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या दिनांक ०८.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सर्व सार्वजनिक विद्यापीठांच्या कुलगुरूंना कळविले आहे की, पुढील शैक्षणिक वर्षापासून बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एम.एस, बी. डिझाईन व बॅचलर ऑफ फॅशन डिझाईन हे अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) मार्फत नियंत्रित (Regulate) केले जाणार आहेत. त्याचप्रमाणे अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) मार्फत पोर्टलवर दिनांक ०६.१२.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या Hand Book मध्ये बॅचलर ऑफ डिझाईन व बॅचलर ऑफ फॅशन डिझायनिंग या अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

३. जे अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) मार्फत नियंत्रित केले जातात त्या महाविद्यालयांना मान्यता देणेबाबतची कार्यवाही AICTE मार्फत केली जाते. उपरोक्त नमूद

काही अभ्यासक्रम AICTE मार्फत नियंत्रित केले जातील या विषयीच्या सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाकडून शासनास दिनांक ०८.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाल्या आहेत.

४. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता नवीन महाविद्यालयांना इरादापत्र मंजूर करण्याचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले होते. सदर प्रस्तावांमध्ये बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एम.एस, बी. डिझाईन व बॅचलर ऑफ फॅशन डिझाईन या अभ्यासक्रमांच्या नवीन महाविद्यालयांचा समावेश होता. तथापि, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ०८.०१.२०२४ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने सर्व सार्वजनिक विद्यापीठांना शासनस्तरावरून दिनांक ०३.०२.२०२४ रोजी ई-मेलद्वारे खालील सूचना देण्यात आलेल्या आहेत:-

"AICTE ने त्यांच्या अधिनस्त अभ्यासक्रमांशी संबंधित महाविद्यालयांसाठी नवीन प्रस्ताव सादर करण्याच्या अंतिम मुदतीबाबतची जाहिरात प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळे सार्वजनिक विद्यापीठांमार्फत शासनाकडे प्रस्ताव सादर केलेल्या इच्छुक संस्थांनी विहित मुदतीत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) कडे नोंदणी करणेबाबत सर्व संस्थांना आपल्या स्तरावरून तात्काळ कळविण्यात यावे. AICTE च्या मानकांप्रमाणे आवश्यक असणाऱ्या निकषांच्या पुर्ततेबाबतचा तपशिल संबंधित संस्थेने विद्यापीठाकडे सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर तपशिलाची विद्यापीठाने खातरजमा करून संबंधित संस्थांचा ना-हरकत प्रमाणपत्राकरीताचा प्रस्ताव शासनास सादर करावा लागेल. यानुषंगाने आपल्या स्तरावरून सर्व संबंधित संस्थांना अवगत करावे."

५. विस्तारीकरणांतर्गत नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी यांना मान्यता देण्याच्या प्रस्तावांमध्ये बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एम.एस, बी. डिझाईन, बॅचलर ऑफ फॅशन डिझाईन व AICTE (HAND BOOK) मध्ये नमूद अभ्यासक्रम/विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी यांच्या प्रस्तावांचा समावेश असण्याची शक्यता आहे.

६. तथापि, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ०८.०१.२०२४ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एम.एस., बी. डिझाईन, बॅचलर ऑफ फॅशन डिझाईन व AICTE (HAND BOOK) मध्ये नमूद अभ्यासक्रम/विषय, अतिरिक्त तुकडी, विद्याशाखा यांचे प्रस्ताव शासनास सादर करण्यात येऊ नये याची कृपया नोंद घ्यावी.

(प्रशांत होळकर)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. सर्व विभागीय सहसंचालक, महाराष्ट्र राज्य.
३. निवडनस्ती (मशि-४)